




# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25








वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८२ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । ०४/०४/२०२६ । पान - ६







## बनावट वैद्यकीय व्यवसायावर धडक कारवाई

### चौघांवर गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील निमोण परिसरात विनापरवाना वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांवर संगमनेर तालुका पोलिसांनी मोठी कारवाई करत चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी दुपारी निमोण येथे काही व्यक्ती कोणतीही अधिकृत वैद्यकीय पात्रता नसताना औषधांची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. या कारवाईत मोठ्या प्रमाणात विविध प्रकारची संशयित औषधे जप्त करण्यात आली. या प्रकरणी वैद्यकीय अधिकारी अतुल गणेश घुले (वय २९, निमोण प्राथमिक आरोग्य केंद्र) यांनी दिलेल्या



**खरात प्रकरणानंतर राज्यात भोंदूगिरी आणि बोगस डॉक्टरांचा विषय मोठ्या प्रमाणावर गाजत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये अनेक भोंदूबाबा गजाआड झाले. तर संगमनेर तालुक्यातील निमोण येथे सरपंच संदीप देशमुख यांच्या सतर्कतेमुळे गावात बोगस वैद्यकीय सेवा देऊन नागरीकांच्या जीवाशी खेळत असणाऱ्या टोळीला पोलीसांनी जेरबंद केले अजूनही तालुक्यात भोंदूगिरी करणारे बाबा आणि बोगस डॉ. कार्यरत आहेत. त्यांच्यावरही कारवाईची गरज आहे.**

फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक १५६/२०२७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. संबंधितांवर वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम १९६१ चे कलम ३३ तसेच राष्ट्रीय चिकित्सा आयोग अधिनियम ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यात डॉ. वसंत सांडू लांडगे, सतीश कचरू शिरसाट (वय ३७, चालक), अरुण शांताराम सरोदे (वय ४९) आणि आदित्य वसंत लांडगे (वय २७) या चौघांचा समावेश असून ते छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असल्याची माहिती आहे.पोलिसांनी घटनास्थळावरून श्वासयोग चूर्ण, डायबेटिक पावडर, वाताहार औषधे, सर्वशक्ती पावडर, सुपारी पाक, त्वचारोगावरील औषधे, विविध गोळ्या व द्रव औषधे अशा विविध प्रकारच्या औषधांचा साठा जप्त केला आहे. या औषधांवर आवश्यक माहिती नसल्याने त्यांची वैधता संशयास्पद असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे व पोलीस उपनिरीक्षक एम. व्ही. शिंदे यांनी तातडीने कारवाई केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करत असून, या रॅकेटमागील आणखी कोणाचा सहभाग आहे का याचा शोध घेतला जात आहे.

बनावट वैद्यकीय व्यवसायामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## अवकाळी पावसाचा विट उद्योगाला मोठा फटका

### तातडीने पंचनामे व मदतीची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे विट भट्टी व्यवसायाला मोठा आर्थिक फटका बसला असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आधीच कच्चा माल महागल्यामुळे अडचणीत आलेल्या विट उत्पादकांना या अनपेक्षित पावसाने आणखी संकटात ढकलले आहे. या पार्श्वभूमीवर जलसंधारण मंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे.

तालुक्यातील विट भट्टी व्यवसाय हा मागील काही वर्षांपासून तोट्यात चालू आहे. विट निर्मितीसाठी लागणारी माती, राख, कोळसा, भुसा यांसारख्या कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ झाल्याने उत्पादक आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीस आले आहेत. अशातच अवकाळी पावसामुळे तयार विटा तसेच प्रक्रियेत असलेल्या विटांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विट उत्पादकांचे म्हणणे आहे की, देशात विट उद्योग हा असा एकमेव व्यवसाय असावा की ज्यासाठी कोणतीही विमा योजना उपलब्ध नाही. गेल्या अनेक वर्षांपासून या व्यवसायाला विमा संरक्षण मिळावे, यासाठी शासन आणि विमा कंपन्यांकडे पाठपुरावा केला जात आहे. मात्र, अद्याप कोणतेही ठोस धोरण तयार झालेले नाही. विमा कंपन्या हा विषय शासनाचा असल्याचे सांगतात, तर शासनाकडूनही याकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या पिकांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाल्यास पंचनामे करून मदत दिली जाते. त्याच धर्तीवर विट उद्योगासाठीही स्वतंत्र धोरण तयार करून नुकसानभरपाई व विमा योजना लागू करावी, अशी मागणी विट व्यावसायिकांनी केली आहे.

विट भट्टी धारक दरवर्षी शासनाला मातीची रॉयल्टी व इतर कर नियमित भरत असताना, नुकसान झाल्यानंतर प्रशासनाकडून पंचनामे करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. कुंभार समाजाला ५०० ब्रासपर्यंत रॉयल्टी सवलत असताना, विट उत्पादकांकडून मात्र जबरदस्तीने १०० ब्रासची रॉयल्टी वसूल केली जाते, याबाबतही नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर संगमनेर व अकोले तालुक्यातील विट उत्पादकांनी प्रशासनाकडे तातडीने नुकसानग्रस्त भट्ट्यांचे पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, तसेच विट उद्योगासाठी कायमस्वरूपी विमा योजना लागू करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी केली आहे.

या मागणीचे निवेदन अध्यक्ष कैलास वाकचौरे (विट उत्पादक संघ, संगमनेर-अकोले) यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले असून, त्याची प्रत आमदार अमोल खताळ, प्रांताधिकारी व तहसीलदार, संगमनेर यांनाही देण्यात आली आहे.

विट उत्पादकांमध्ये राजू जोर्वेकर, मच्छिंद्र जोर्वेकर, संतोष जोर्वेकर, बाळासाहेब जोर्वेकर, अनिल जोर्वेकर, दिगंबर जोर्वेकर, विशाल सोनवणे आदींचा समावेश असून, त्यांनी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून दिलासा द्यावा, अशी एकमुखी मागणी केली आहे.

## क्रांतिकारी राजापूरचे क्रांतिकारी धाडस

### लग्नात एकच 'आशीर्वाद', दशक्रियेत एकच 'श्रद्धांजली'

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी परंपरेमुळे राज्यभर ओळख असलेल्या राजापूर गावाने समाज परिवर्तनाच्या दिशेने घेतलेला एक महत्त्वपूर्ण निर्णय पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. लग्न समारंभात 'एकच आशीर्वाद' आणि दशक्रिया विधीत 'एकच श्रद्धांजली' या अभिनव उपक्रमाची अंमलबजावणी गावाने गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने केली असून, नुकत्याच झालेल्या एका दुःखद प्रसंगातही या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली.



राजापूरचे सुपुत्र कै. माधव रामभाऊ हासे यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण गावासह पंचक्रोशीत शोककळा पसरली होती. विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने दशक्रिया विधीस उपस्थित राहणार असल्याने अनेक श्रद्धांजलीपर भाषणे होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत होती. मात्र, गावाच्या ठरलेल्या परंपरेला अनुसरून जिजाबा हासे व त्यांच्या सहकाऱ्यांनी संयम राखत 'एकच श्रद्धांजली' या निर्णयावर ठाम भूमिका घेतली.

गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या दशक्रिया विधीत उपस्थित सर्व मान्यवरांना या उपक्रमाची माहिती देण्यात आली. त्यानंतर पुणे येथील प्रसारमाध्यम व योग क्षेत्रात कार्यरत प्रा. योगाचार्य संतोष देशमुख यांच्याकडे एकमेव श्रद्धांजली व्यक्त करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. देशमुख यांनी कै. हासे यांच्या कौटुंबिक, सामाजिक व राजकीय कार्याचा सखोल आढावा घेत त्यांच्या कार्याची व्यापकता उपस्थितांसमोर प्रभावीपणे मांडली.

त्यांच्या निधनाने कुटुंबासह गाव, पंचक्रोशी, तसेच त्यांनी मदत केलेल्या अनेक गरजू घटकांवर झालेल्या परिणामांचा उल्लेख करताना सभागृहातील वातावरण अत्यंत भावनिक झाले.अशा दुःखद वातावरणातही राजापूरने आपल्या क्रांतिकारी निर्णयाची अंमलबजावणी कायम ठेवत 'एकच श्रद्धांजली' या उपक्रमाचा आदर्श पुन्हा एकदा घालून दिला. उपस्थित मान्यवरांनी संयोजकांचे कौतुक करत या उपक्रमाचे स्वागत केले.

दरम्यान, अंत्ययात्रा ते दशक्रिया विधीपर्यंतच्या सर्व कार्यक्रमांची जबाबदारी रामहरी कातोरे, जिजाबा हासे, व्यंकटेश देशमुख, डॉ. विजय हासे, संतोष हासे, ॲड. बी. एन. गायकर, विश्वनाथ गोसावी, गोकुळ खतोडे, आनंद खतोडे बाळासाहेब हासे, भाऊसाहेब हासे, शिवाजी हासे, गोरख देशमुख, पोपट खुळे, सतीश हासे, प्रशांत तिकांडे, रमेश हासे, रमेश जाधव, सचिन हसे, सुनील गोसावी, परसराम हासे यांच्यासह युवक, तरुण कार्यकर्ते, माधवशेठ मित्र मंडळाचे कार्यकर्ते यांनी विशेष नियोजन केले होते. राजापूरच्या या सामाजिक दृष्टिकोनातून घेतलेल्या निर्णयाची नोंद घेऊन इतर गावांनीही अशा उपक्रमांचा अवलंब करावा, अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या. गावाच्या या अनुकरणीय परंपरेमुळे कार्यक्रम अधिक सुटसुटीत, शिस्तबद्ध आणि संवेदनशील पद्धतीने पार पडत असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

## जिल्ह्यावर अवकाळीचे संकट कायम



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जिल्ह्यात मार्च महिन्यांच्या मध्यापासून बेमोसमी वादळी पावसाला सुरूवात झालेली असून येत्या रविवार (दि. ५) पर्यंत वादळी पावसासह गारपिठीची शक्यता कायम आहे. जिल्ह्यात आज पुन्हा ऑरेंज, उद्या शनिवारी येलो तर रविवारी पुन्हा वादळी पावसाची शक्यता असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, गुरूवारी दुपारपासून नगरसह जिल्ह्याच्या विविध भागात ढगाळ वातावरणासह अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत होत्या. ऐन उन्हाळ्यात पावसाळी वातावरण तयार झाले होते.गेल्या १५ दिवसापासून जिल्ह्यात बेमोसमी पाऊस कोसळत आहे. या पावसामुळे हजारो शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झालेले असून कृषी आणि महसूल विभागाकडून झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरू आहे. त्यात अनेक ठिकाणी पावसासह गारपिटीचा तडाखा सुरू आहे. बुधवारी पुन्हा पारनेर तालुक्यातील आठ गावात शेतकर्यांचे काढणीला आलेल्या पिकांसह, भाजीपाला व अन्य पिकांचे नुकसान झालेले आहे. दरम्यान, येत्या रविवारपर्यंत जिल्ह्यात बेमोसमी पावसाचा धोका कायम असून अनेक ठिकाणी गारपिट आणि वादळी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिलेला आहे. जिल्ह्यात शुक्रवारी ऑरेंज, शनिवारी येलो तर रविवारी वादळी पावसाचा इशारा देण्यात आलेला आहे. यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यातवीने करण्यात आलेले आहे.

जिल्हा प्रशासनाच्यावतीने देण्यात आलेल्या आकडेवारीत जिल्ह्यात बुधवारी सर्वाधिक पावसाची नोंद पाथर्डी तालुक्यात झाल्याचे समोर आले आहे. यात खरवंडी व टाकळी महसूल मंडळात प्रत्येकी ४२ मि.मी., माणिक दौंडी व पाथर्डी ३६.५ मि.मी., तिसगाव ३२.५ मि.मी., अकोला २१.५ मि.मी., नेवासा तालुक्यातील सोनई ३४.५. मि.मी., सलाबतपूर ३२.५ मि.मी., नेवासा ब्रु. २२ मि.मी., प्रवरा संगम ३२, राहाता तालुक्यातील बाभळेश्वर २४.३. मि.मी., पुणतांबा २४.३. मि.मी. राहाता २४.३. मि.मी., शेवगाव तालुक्यातील चापडगाव १८.८ मि.मी. आणि चापडगाव २२.३ मि.मी., जामखेड १० मि.मी. पावसाची नोंद झालेली आहे.










# मुस्लिम शिक्षणातील 5% आरक्षण रद्द का? हायकोर्टाचा सरकारला सवाल

मुंबई (वृत्तसंस्था)

मुस्लिम समाजाला देण्यात आलेलं आरक्षण रद्द करण्याचा राज्य सरकारचा निर्णय हा योग्यच होता. ठरलेल्या मुदतीत यासंदर्भात कायदाच तयार होऊ न शकल्यानं ते आरक्षण कायद्याच्या चौकटीत बसणारं नव्हतं. त्यामुळे तो अध्यादेश तांत्रिकदृष्या रद्दबातलच झालेला होता. याबाबतची रितसर अधिसूचनाही जारी करण्यात आल्यानं यासंदर्भातील याचिकेला काहीही अर्थ नाही, अशी भूमिका गुरुवारी राज्य सरकारच्या वतीनं मुंबई उच्च न्यायालयात मांडण्यात आली.

मुस्लिम आरक्षण रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात न्यायमूर्ती रियाझ छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठापुढे गुरुवारी सुनावणी झाली. याचिकाकर्ते वकील एजाझ नक्की यांनी यावेळी कोर्टाला सांगितलं की साल २०१४ मध्ये हायकोर्टानं याबाबत दिलेल्या निकालाला कुणाकडूनही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलेलं नाही. त्यामुळे हायकोर्टाच्या निर्देशांचं पालन करण्याऐवजी राज्य सरकारनं मनमानी पद्धतीनं हा निर्णय घेतला. त्यामुळे हा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी या याचिकेतून करण्यात आली. रातोरात राज्य सरकारनं शिक्षणात मुस्लिमांना दिलेलं ५ टक्के आरक्षण रद्द का केलं? असा सवाल याचिकेत उपस्थित करण्यात आला. या याचिकेवर उत्तर देण्याकरता राज्य सरकारनं दोन आठवड्यांचा अवधी गुरूवारी मागून घेतला, तो मान्य करत त्यावर त्यानंतर पुढील आठवड्याभरात याचिकाकर्त्यांना उत्तर देण्याचे निर्देश देत हायकोर्टानं यासंदर्भातील याचिकेवरील सुनावणी तहकूब केली.

राज्य सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागानं मंगळवारी याबाबतचा शासन निर्णय काढून शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सरकारी तसेच निमसरकारी नोकऱ्यांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण देणारा २३ डिसेंबर २०१४ रोजीच रद्द झाला. मुस्लिम समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्र प्रक्रियेलाही या निर्णयामुळे ब्रेक लागणाराय. लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर, आगामी विधानसभा निवडणुकां डोळ्यासमोर ठेवत राज्य सरकारनं मराठा आणि मुस्लीम आरक्षणासंदर्भात निर्णय घेतला होता. ज्यात सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठा समाजाला १६ टक्के आणि मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण जाहीर केले गेले होते.

# महागाईवर नियंत्रणासाठी केंद्राचे पाऊल; पेट्रोकेमिकल आयात स्वस्त

नवी दिल्ली (वृत्तसंस्थाा)

मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या तणावामुळे आणि त्यामुळे जागतिक पुरवठा साखळीत निर्माण झालेल्या व्यत्ययाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने एक मोठा दिलासादायक उपाय योजला आहे. सरकारने अनेक अत्यावश्यक पेट्रोकेमिकल उत्पादनांच्या आयातीवरील सीमा शुल्क तात्पुरते रद्द केले आहेत. हा निर्णय ३० जूनपर्यंत लागू राहील आणि त्याचा उद्योग व ग्राहक या दोघांनाही थेट फायदा होईल.

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. विशेषतः रसायने, खते आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या पुरवठ्याबाबत चिंता वाढली आहे. देशांतर्गत अत्यावश्यक कच्च्या मालाची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे.



सरकारने ज्या पेट्रोकेमिकल उत्पादनांवरील सीमा शुल्क हटवले आहे, त्यांमध्ये मिथेनॉल, निर्जल अमोनिया, टोल्युइन, स्टायरिन, डायक्लोरोमिथेन, विनाइल क्लोराइड मोनोमर, पॉलीब्युटाडाइन, स्टायरिन ब्युटाडाइन आणि असंतृप्त पॉलिस्टर रेझिन्स यांचा समावेश आहे. ही सर्व उत्पादने अनेक उद्योगांसाठी अत्यावश्यक कच्चा माल आहेत. या निर्णयाचा थेट फायदा प्लॅस्टिक, पॅकेजिंग, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, ऑटोमोबाईल आणि रासायनिक क्षेत्रांना होईल. या उद्योगांमधील खर्च कमी होईल, ज्यामुळे उत्पादन स्वस्त होईल आणि अंतिम उत्पादनांच्या किमतींवर खालील दिशेने दबाव येईल.

जेव्हा कंपन्यांचा खर्च कमी होतो तेव्हा त्याचा परिणाम बाजारात उपलब्ध असलेल्या उत्पादनांच्या किमतींवरही होतो. याचा अर्थ असा की, प्लास्टिकच्या वस्तू, औषधे, पॅकेजिंग आणि इतर दैनंदिन वापराच्या वस्तू स्वस्त होऊ शकतात, ज्यामुळे सर्वसामान्य लोकांना दिलासा मिळेल. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर जागतिक कच्च्या तेलाच्या किमती जवळपास ५० टक्क्यांनी वाढल्या आहेत. यामुळे भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांची चिंता वाढली आहे.

वाढत्या किमतींचा सामना करण्यासाठी सरकारने अलीकडेच पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १० रुपयांनी कमी केले आहे. डिझेल आणि एव्हिएशन टर्बाइन फ्युएलवर निर्यात शुल्कही आकारण्यात आले आहेत.

# आगळीक केली तर थेट प्रत्युत्तर

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचा इशारा

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)



आपले शेजारी सध्या अशा स्थितीत आहेत की ते काहीतरी आगळीक करु शकतात. त्यांनी असे केल्यास भारताकडून जोरदार आणि तीव्र स्वरुपाचे उत्तर दिले जाईल. ऑपरेशन अद्याप समाप्त झालेले नाही. काही आगळीक करण्याचा प्रयत्न केल्यास जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल, अशा शब्दांत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला कडक शब्दात इशारा दिला आहे. मध्यपूर्वेत सुरु असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राजनाथ सिंह यांनी शेजाऱ्यांना इशारा दिला. ऑपरेशन सिंदूर अजून सुरु असल्याचेही त्यांनी नमूद केले. सिंह यांनी यावेळी भाषणात थेट कोणत्याही देशाचे नाव घेण्याचे टाळले.

केरळममध्ये आयोजित सैनिक सन्मान संमेलन कार्यक्रमात राजनाथ सिंह बोलत होते. इराणच्या होर्मुझ सामुद्रधुनीतून भारतीय जहाजांना भारतीय नौसेना सुरक्षितपणे बाहेर काढून देशात आणत आहे. देशात इंधन तुटवडा असल्याचा दावा राजनाथ सिंह यांनी खोडून काढला. मध्यपूर्वेतील संघर्षावरुन काहीजण विनाकारण अफवा पसरवून भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, असेही सिंह म्हणाले. देशात पेट्रोल, डिझेल किंवा गॅसचा तुटवडा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विरोधक इंधन, तेल या विषयावरुन राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या कठीण काळात देशाबरोबर उभं न राहता ते राजकारण करत असल्याचे सिंह म्हणाले. मध्यपूर्वेत संघर्ष सुरु असल्याने हा काळ थोडा आव्हानात्मक आहे. केरळममधील अनेक लोक या भागात काम करतात पण, त्यांच्या सुरक्षेची काळजी सरकार घेत आहे, त्यामुळे अधिक काळजी करु नये, असे राजनाथ सिंह म्हणाले.

# कोपरगावात खळबळ; ५७ खातेदारांच्या १०० खात्यांवर भोंदू खरातचा ताबा

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव - पतसंस्थांमध्ये वेगवेगळ्या लोकांच्या नावे खाते उघडून या खात्यांवर भोंदूबाबा अशोक खरात हा व्यवहार करत होता हा खळबळजनक प्रकार पोलिस तपासात समोर आला आहे. विशेष म्हणजे या सर्वच खात्यांचा वारसदार अशोक खरात असल्याचीही माहिती आहे. यात प्रतिभा चाकणकर व त्यांच्या मुलीच्याही नावाचे खाते असल्याची माहिती आहे.खरात हा सावकारीचे काम करून लोकांच्या जमिनी स्वतःच्या नावावर करत होता. यातील अनेक व्यवहार हे समता व जगदंबा या दोन पतसंस्थांच्या माध्यमातून झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी या पतसंस्थांना पत्र देऊन खात्यांची माहिती मागवली आहे. कोपरगाव येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या राहाता शाखेत एकूण ५७ खातेदारांनी १०० खाती उघडली आहेत. या प्रत्येक खात्याला नॉमिनी (वारसदार) म्हणून अशोक खरात याचे नाव असल्याची माहिती आहे.या खात्यांवर सुमारे ६० कोटी रुपयांचा व्यवहार झाला आहे. यामध्ये आठ खाती ही खरात कुटुंबीयांची आहेत. यामध्ये चाकणकर नावाचेही खातेदार असल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे या सर्व खात्यांशी अशोक खरात याचा मोबाइल नंबर जोडलेला आहे.खरातच्या पत्नीला लूकआऊट नोटीस अशोक खरात व त्याची पत्नी कल्पनाविरुद्ध



सावकारी व जमीन बळकावल्याप्रकरणी शिर्डीत गुन्हा दाखल झाला आहे. कल्पना पळून जाऊ नये म्हणून पोलिसांनी लूकआऊट नोटीस जारी केली असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.'त्या' चाकणकर कोण? खरात वारसदार असलेली खाती कुणाच्या नावे आहेत याबाबत पोलिसांना विचारले असता त्यांनी नावे सांगण्यास नकार दिला. मात्र प्रतिभा चाकणकर व आणखी एक चाकणकर अशा दोन नावांनी खाते असल्याची माहिती आहे. महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या बहिणीचेही नाव प्रतिभा आहे.'सर्व खाती कायदेशीर' समता पतसंस्थेचे संचालक संदीप कोयटे म्हणाले, ही सर्व खाती कायदेशीर होती. पतसंस्थेत एक लाख दहा हजार खातेदार असल्याने काही खात्यांना एकच नॉमिनी असेल तर ते लक्षात येत नाही.

# प्रस्थापितांना धक्का, दहा वर्षांपेक्षा अधिक काळ संचालकपद नको

अहिल्यानगर (प्रतिनिधी)

सहकार मंत्रालयाच्या बँकिंग कायद्यात दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा बँकेत प्रस्थापित घराण्यांना आता धक्का बसणार आहे. १० वर्षांपेक्षा अधिक काळ संचालक राहिलेल्यांना आता पुढील निवडणुक लढवता येणार नाही, अशी कायद्यात दुरुस्ती करण्यात आली आहे.

क्षेत्राचे राज्यातील सहकार राजकारण आणि सत्तेचे केंद्र असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत केंद्र सरकारच्या बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम २०२५ मुळे बदल होणार आहेत. गेल्या १० वर्षांपासून अधिक काळ संचालक पदावर ठाण मांडलेल्या नेत्यांना आगामी निवडणुकीसाठी अपात्र ठरवण्यात आले आहे. सहकार मंत्रालयाने या निर्णयाच्या कडक अंमलबजावणीचे आदेश सहकार आयुक्तांना दिले असून, यामुळे सर्वच दिग्गज नेत्यांचे बँकेतील वर्चस्व संपुष्टात येण्याची चिन्हे आहेत. बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम २०२५ नुसार, राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांत १० वर्षांपेक्षा जास्त काळ संचालक राहिलेल्या व्यक्ती बँकेच्या पुढील निवडणुकीसाठी अपात्र ठरणार आहेत. राज्याच्या सहकार मंत्रालयाने सहकार आयुक्तांना बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम २०२५ या निर्णयाच्या अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत.

यामुळे वर्षानुवर्षांपासून संचालक पद भूषविणाऱ्यांना सहकार मंत्रालयाच्या या निर्णयामुळे आता कायमचे घरी बसावे लागण्याची शक्यता आहे. अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची मुदत संपलेली आहे. ही निवडणूक आता दिवाळीनंतर होण्याची शक्यता आहे. बँकिंग सुधारणा नियमांचा फटका जुन्या संचालकांना बसणार आहे.

# अवैध प्रवासी वाहतुकीवर आळा घालण्यासाठी कडक भूमिका - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई (वृत्तसंस्था)



राज्यातील वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मोटार परिवहन विभाग व एसटी महामंडळाची उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील सद्यस्थितीबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली असून, तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत सादर करण्यात आलेल्या १ महिन्याच्या अहवालानुसार, राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे निदर्शनास आले. अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याची नोंद करण्यात आली असून, त्यामागील प्रमुख कारणे म्हणजे स्थानिक स्तरावर आदेशांची प्रभावी अंमलबजावणी न होणे, तसेच एसटी व आर.टी.ओ. विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले. एसटीकडून कारवाईसाठी उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचा काही ठिकाणी गैरवापर होत असल्याचे गंभीर निरीक्षण नोंदविण्यात आले. काही ठिकाणी या वाहनांचा वैयक्तिक वापर केल्याच्या तक्रारीही समोर आल्या. याशिवाय, राज्यातील ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांपैकी केवळ २० कार्यालयांना एसटी कडून आवश्यक वाहन व मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे आढळून आले. दर १० दिवसांनी कारवाई अहवाल सादर करण्याचे निर्देश असतानाही अनेक ठिकाणी त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले. काही भागांत केवळ दिखाऊ कारवाई होत असल्याची नोंद करण्यात आली असून, आर.टी.ओ. अधिकाऱ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली.

यावेळी मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट निर्देश देताना सांगितले की, अवैध वाहतूक रोखण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करणे अत्यावश्यक आहे. एसटीकडून उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचा वापर केवळ कारवाईसाठीच करण्यात यावा आणि त्याचा कोणताही गैरवापर सहन केला जाणार नाही. तसेच, आर.टी.ओ.च्या सर्व ५९ कार्यालयांना आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी एसटीने तातडीने कार्यवाही करावी, असेही निर्देश देण्यात आले. प्रत्येक संयुक्त कारवाईचा फोटो व लेखी अहवाल मुख्य कार्यालयात सादर करणे बंधनकारक करण्यात आले असून, निष्क्रिय व जबाबदारी टाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला.

# महाराष्ट्रात अंधश्रद्धेचा कहर

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात भोंदू बाबांची १५०० हून अधिक प्रकरणे नोंदवली गेली आहे. अशोक खरात याने तथाकथित पूजेच्या नावाखाली अनेक महिलांचे लैंगिक शोषण केले.

आता मी महादेवाचा अवतार आहे, असा दावा करून वसईसारख्या भागांमध्ये महिलांचे शोषण करणाऱ्या ऋषिकेश वैद्य नावाच्या एका फसव्या बाबाचे प्रकरणही उघडकीस आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधील पोलीस ठाण्यांनी भोंदू बाबांशी संबंधित १५०० हून अधिक गुन्हे दाखल केले आहे. काही जिल्ह्यांमध्ये ४९१ घटनांची नोंद झाली असून, त्यात १,८०६ आरोपींचा समावेश आहे. ही माहिती महाराष्ट्रातील लातूर येथील ज्येष्ठ कार्यकर्ते आणि 'अनीस'चे राज्य कार्यकारी अध्यक्ष यांनी दिली.

# इराणचा सर्वात मोठा पूल उध्वस्त

## डोनाल्ड ट्रम्प यांची इराणला तडजोड करण्याची धमकी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पश्चिम आशियातील युद्धाने आता अतिशय भयानक वळण घेतले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील 'करज' भागातील एका महाकाय पुलावर झालेल्या भीषण हल्ल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करत जगाला हादरवून सोडले आहे. इराणने वेळेत तडजोड करावी, अन्यथा परिस्थिती यापेक्षाही भीषण होईल,ड़ असा थेट इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. या हल्ल्यामुळे इराणची दळणवळण यंत्रणा कोलमडली असून ट्रम्प यांनी याला इराणवरील दबावाचे सर्वात मोठे शस्त्र बनवले आहे. ट्रम्प यांच्या या धमकीला इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियान यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे. पूल उद्ध्वस्त करणे समजू शकते, पण रुग्णालये, औषध कंपन्या आणि मेडिकल रिसर्च सेंटर्सवर हल्ले करण्याचा काय अर्थ? हा मानवतेविरुद्धचा गुन्हा आहे, अशा शब्दांत पेजेश्कियान यांनी आपला संताप व्यक्त केला. त्यांनी जागतिक आरोग्य संघटना आणि रेड क्रॉस सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले आहे. एकीकडे अमेरिका हल्ले करत असताना इराणनेही माघार घेतलेली नाही. गुरुवारी इराणने इस्त्रायल आणि खाडीतील अरब देशांवर क्षेपणास्त्रांचा पाऊस पाडला. ट्रम्प यांनी 'इराणचा धोका संपला आहे' असा दावा केला असतानाच, इराणने या हल्ल्यांमधून आपली शक्ती अजूनही शाबूत असल्याचे दाखवून दिले आहे. या युद्धामुळे जागतिक तेल पुरवठा विस्कळीत झाला असून त्याचे चटके संपूर्ण जगाला बसत आहेत. गातील २०



टक्के तेल पुरवठा होणाऱ्या 'होर्मुझच्या सामुद्रधुनी'वर सध्या इराणचे नियंत्रण आहे. हा मार्ग मोकळा करण्यासाठी ब्रिटन आता ३० हून अधिक देशांसोबत चर्चा करण्याची योजना आखत आहे. ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे की, होर्मुझचा मार्ग बळाचा वापर करून उघडला जाऊ शकतो, पण हे काम केवळ अमेरिकेचे नाही. ज्या देशांना तेल हवे आहे, त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन हा मार्ग ताब्यात घ्यावा, असे आवाहन ट्रम्प यांनी केले आहे. इराणची छुप्या शस्त्रांची धमकीअमेरिकेच्या लष्करी कारवाईवर इराणच्या लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट कर्नल इब्राहिम जुल्फिकारी यांनी मोठे विधान केले आहे. अमेरिकेने ज्या ठिकाणांना लक्ष्य केले आहे, ती आमच्यासाठी फारशी महत्त्वाची नाहीत. आमची खरी रणनीतिक शस्त्रे आणि उत्पादन केंद्रे अशा ठिकाणी आहेत, ज्याची अमेरिकेला कल्पनाही नाही आणि तिथे ते कधीही पोहोचू शकणार नाहीत.

# होर्मुज सामुद्रधुनी पुन्हा खुली करा, भारताची मागणी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणच्या नियंत्रणात गेलेली होर्मुजची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्याची भारताने मागणी केली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी ब्रिटनच्या पुढाकाराने आयोजित बहुपक्षीय बैठकीत ही भूमिका मांडली. या संघर्षात जलमार्गावर आपले नागरिक गमावणारा भारत हा एकमेव देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ब्रिटनने आयोजित केलेल्या या आभासी बैठकीत ६० हून अधिक देश सहभागी झाले होते. बैठकीचा मुख्य उद्देश होर्मुज सामुद्रधुनीत सुरक्षित आणि निर्बाध जहाजवाहतूक सुनिश्चित करणे हा होता. या संकटामुळे जागतिक तेलाच्या किमतीत मोठी वाढ होत आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनानुसार, मिस्री यांनी आंतरराष्ट्रीय जलमार्गांमध्ये मुक्त नौवहनाच्या तत्त्वावर भर दिला. तसेच या संघर्षाचा भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर होत असलेला परिणामही त्यांनी अधोरेखित केला.बैठकीत त्यांनी सांगितले की, होर्मुज परिसरातील व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांमध्ये भारतानेच सर्वाधिक नुकसान सोसले आहे. डायरेक्टोरेट जनरल ऑफ शिपिंगच्या माहितीनुसार, विदेशी ध्वज असलेल्या जहाजांवर कार्यरत किमान तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला असून एक जखमी आहे. काही जहाजे

# विधानसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचा मोठा निर्णय

## सुनेत्रा पवारांच्या विरोधात उमेदवार देणार

मुंबई (वृत्तसंस्था)

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने मोठा राजकीय निर्णय घेतला आहे. दोन्ही मतदारसंघात निवडणूक लढवण्याचा निर्धार पक्षाने केला असून, पक्षश्रेष्ठींकडून यासाठी हिरवा कंदील मिळाल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे राज्याच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा रंगू लागली आहे.



राज्यातील बारामती आणि राहुरी या महत्त्वाच्या विधानसभा मतदारसंघांमध्ये होणाऱ्या पोटनिवडणुकांकडे सर्वांचे लक्ष लागलेले असताना काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पक्षाने या दोन्ही जागांवर उमेदवार देण्याचा निर्णय घेतला असून, यासाठी स्थानिक पातळीवरील परिस्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. बारामतीत संभाव्य उमेदवारांच्या मुलाखती नुकत्याच पार पडल्या असून, इच्छुकांची संख्या मोठी असल्याने अंतिम उमेदवार निवडताना पक्ष नेतृत्व काळजीपूर्वक निर्णय घेणार असल्याचे सांगितले जात आहे.

राहुरी मतदारसंघातही उमेदवार निश्चितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. दोन्ही ठिकाणी उमेदवारांची नावे जाहीर करण्यापूर्वी मित्रपक्षांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. महाविकास आघाडीतील जागावाटप आणि रणनीती यावरही या निर्णयाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राजकीय घडामोडींना वेग येण्याचे संकेत मिळत आहेत.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की, पक्षश्रेष्ठींशी चर्चा करूनच हा निर्णय घेण्यात आला आहे. बारामतीसाठी सहा अर्ज तर राहुरीसाठी चार अर्ज प्राप्त झाले आहेत. तसेच, इच्छुक उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखतीही पार पडल्या आहेत. येत्या दोन दिवसांत निवडणुकीबाबत अधिकृत भूमिका जाहीर करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले होते. दरम्यान, आज समोर आलेल्या माहितीनुसार काँग्रेसने दोन्ही मतदारसंघात उमेदवार देण्याचा निर्णय निश्चित केला आहे. उमेदवार निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, आज दिवसभरात ती पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर उद्या माध्यमांसमोर अधिकृत घोषणा करण्यात येणार असल्याचे सपकाळ यांनी सांगितले आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



## कुटे हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिर उत्साहात



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

भाऊसाहेब दामोदर कुटे यांच्या ७० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने कुटे हॉस्पिटल, संगमनेर येथे आधार रक्तपेढीच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या शिबिरामध्ये रक्ताच्या विविध तपासण्या, जसे सीबीसी, ब्लड युरिया, सिरम क्रिएटिनिन, थायरॉईड फंक्शन टेस्ट, लिपिड प्रोफाइल व गरजू रुग्णांसाठी टूडी इको, ईसीजी या तपासण्या मोफत करण्यात आल्या. रक्तदान शिबिरासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद रक्तदात्यांकडून दिसून आला आणि ७० पेक्षा अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन सकाळी दहा वाजता करण्यात आले. याप्रसंगी विविध मान्यवर तसेच सुकेवाडी गावचे सरपंच सुभाष कुटे, विलास कुटे, विघ्नहर्ता लॉन्सचे प्रोप्रा. राजेंद्र कुटे, दादासाहेब कुटे, सोनाली दादासाहेब कुटे, डॉ. विशाल पटेल, डॉ. फेमुद्दीन शेख, डॉ. सुनील दिघे, नानासाहेब गुंजाळ, मधुकर गुंजाळ, डॉ. सागर गांडोळे, संदीप भाऊसाहेब कुटे, शितल संदीप कुटे, विलास पावशे, गणेश गांडोळे, विजय कुटे, संजय कुटे, बाळासाहेब कुटे, रामदास कुटे, गणेश कुटे, देविदास जाधव, भारत कुटे इत्यादी मान्यवरांनी धन्वंतरी पूजन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस हार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून शिबिरास सुरुवात केली. शिबिराच्या उद्घाटनानंतर अल्पोपहाराचा कार्यक्रम आयोजित केला होता.

सदरचे शिबिर यशस्वी करण्यामध्ये कुटे हॉस्पिटलचे मॅनेजर अण्णासाहेब थोरात, प्रदीप मेडिकलचे संचालक सुनील गागरे, रोहिणी गागरे, प्रभाकर ढमाले, डॉ. सोहेल पठाण, डॉ. कोमल गावंदे, डॉ. स्नेहल घुले, डॉ. राजश्री, शरद अडसुरे, सागर सोनवणे, महेश गांडोळे, संदीप कणसे, गणेश आरोटे, ऋषिकेश कदम, सौरभ वाकचौरे, विक्रम बोराडे, नितीन वाणी, किरण झिंजुर्डे, सौरभ आरगडे, ऋषिकेश मनतोडे, अक्षय सोनवणे, नरेश वायकर, ज्ञानेश्वर जमधांडे, युवराज वाळुंज, मंगेश गायकवाड, गुंजाळ मामा, भाऊसाहेब मंडलिक, राजश्री निळे, प्रमिला कदम, पुनम बोंदर्डे, साक्षी बनकर, वृषाली भालेराव, साळू दुधवडे, प्रिया अडसुरे, प्रीती चव्हाण, साक्षी शिंदे, संगीता भालिंगे, काजल कटके, समीर मुळे, योगेश काळे, धीरज सस्कर, विशाल ढोरे, अनिल भुसाळ, विकास भुजबळ तसेच आधार रक्तपेढीचे डॉ. शैलेश तोरकडी, सुरेश दवंगे, प्रदीप जाधव, सौ. ज्ञानेश्वरी यमले, किशोर जाधव, प्रणव रासकर, अजित पलांडे, सिमरन चौरे, शिवम फटांगरे, तक्षशिला रिपवते यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

याप्रसंगी उपस्थित सर्वांचे स्वागत व सूत्रसंचालन विलास प्रभाकर कुटे यांनी केले. शिबिरामध्ये रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान करावे, तसेच रुग्णांनी विविध तपासण्या करून स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, यासंदर्भात डॉ. प्रदीप कुटे व डॉ. सोनाली कुटे यांनी मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहात व सामाजिक बांधिलकी जपत पार पडला.

## माजी मंत्री थोरातांच्या हस्ते सायंखिंडी मंदिराचे कलशारोहण

### हनुमान जयंतीनिमित्त मंदिर प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण उत्साहात

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या सायखिंडी गावच्या लगत असलेल्या रामगड डोंगरावर हनुमान जयंती निमित्त महादेव मंदिर, खंडोबा मंदिर व जाणकामाता मंदिराचा कलशारोहण माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात व पारंपारिक पद्धतीने पूजा करून आनंदात करण्यात आला. हनुमान जयंतीच्या निमित्ताने रामगड डोंगरावर या तीन मंदिरांचा कलशारोहण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, मोहनराव करंजकर, सरपंच सौ. निलम पारधी, माजी सरपंच नवनाथ शिंदे, दीपक करंजकर, मारुती गांडोळे, गोपीनाथ गांडोळे, सागर गांडोळे, सुनील पारधी, बाळासाहेब ताजनपुरे, वसंत गांडोळे, निवृत्ती शिंदे, राजाराम शिंदे, चांगदेव नरवडे, सुरेश बो-हाडे, महेश गोफने, शिवनाथ बोराडे, अमृतवाहिनी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य दशरथ वर्पे, प्रा. जी.बी. बाचकर यांच्यासह



ग्रामस्थ महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महंत दयानंद गिरी महाराज यांच्या उपस्थितीमध्ये रामगड या डोंगरावरती महादेव मंदिर, खंडोबा मंदिर व जाणका माता मंदिराचा कालक्षारोहण व विधिवत मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

हनुमान जयंतीच्या निमित्ताने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने गावातील महिलांनी पारंपारिक वेशभूषा केली. डोक्यावर कलश, हरिनामाचा गजर, टाळ-मृदुंग यांच्या साथीने दिंडी निघाली. मंत्रांच्या आणि राम व हनुमानाच्या उद्घोषात माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते कलशारोहण संपन्न झाले. यावेळी संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, महाराष्ट्राला थोर संत, महात्मे आणि समाज सुधारकांची परंपरा आहे. वारकरी संप्रदाय हा अत्यंत महत्त्वाचा असून सर्वांना सामावून घेणार आहे. मानवता हा धर्म प्रत्येकाने जोपासला पाहिजे.

जात, धर्म, पंथ सर्व बाजूला ठेवून मानवाच्या कल्याणासाठी संतांनी दिलेल्या विचार आपल्या सर्वांना पुढे न्यायचा आहे. हा विचार छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आहे. समानतेच्या वाटेवर लोकशाहीच्या मार्गाने देशाची आणि सर्वांची प्रगती झाली असून मानवता धर्म बळकट करण्यासाठी सर्वांनी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.तर मोहनराव करंजकर म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली गावांमध्ये सातत्याने विकासाच्या योजना राबवल्या गेल्या आहेत. रामगडाला आज प्रति पंढरपूरचे रूप आले आहे. अत्यंत भक्तिमय वातावरणामध्ये हा सोहळा होत असून पुढील अनेक पिढ्यांच्या लक्षात राहणारा हा कार्यक्रम असल्याचे ते म्हणाले. यावेळी गावातील व परिसरातील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवकांनी काढलेली पारंपारिक दिंडी सर्वांचे लक्ष वेधून घेतली होती.

## व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

नीट, जेईई, सीईटी आदी स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रसिद्ध असलेल्या व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटचा ५वा वर्धापन दिन मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ रोजी घुलेवाडी फाटा येथील यशोदीप सेलिब्रेशन सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत उच्च पदांसाठी कठोर परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षस्थानी विद्या विद्यापीठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. नामदेवराव गुंजाळ होते. त्यांनी संस्थेच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संस्थेचे कार्य उल्लेखनीय असल्याचे सांगितले.

संस्थेचे संचालक डॉ. हर्षवर्धन गुंजाळ, प्रा. राहुलकुमार मिश्रा व प्रा. डॉ. ऐश्वर्या साळवे यांनी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले. तसेच अविनाश सूर्यवंशी यांनीही मार्गदर्शनपर भाषण केले.

कार्यक्रमात ऑलिम्पियाड व इतर स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. 'व्हिजन टॅलेंट सर्च परीक्षा'तील गुणवंत विद्यार्थ्यांना सायकली व शिष्यवृत्ती देण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन व नाट्य सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाला पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## पोक्सो गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

सहा वर्षांपूर्वी दाखल झालेल्या पोक्सोच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी अजिंक्य दामोदर मालुंजकर (रा. उंचखडक खुर्द, ता. अकोले) याची संगमनेर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायाधीश मंदार नेरलेकर यांनी गुरुवारी (दि. २ एप्रिल) हा निकाल दिला.



या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, कोरोना लॉकडाऊनच्या काळात १६ एप्रिल २०२० रोजी दुपारी सुमारास अकोले तालुक्यातील खानापूर शिवारात बारा वर्षांची अल्पवयीन मुलगी तिच्या आजीसह शेतात चारा आणण्यासाठी गेली होती. त्यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या आरोपीने लॉकडाऊन व संचारबंदीचे उल्लंघन केल्याचे कारण सांगत त्यांना दमदाटी केली. त्यानंतर मुलीच्या आजीने तिला घरी पाठवले. मात्र, आरोपीने वाटेत तिला गाठून घरी सोडण्याचे आमिष दाखवत मोटारसायकलवर बसवून निर्जन ठिकाणी ऊसाच्या शेतात नेले व तिच्याशी लज्जास्पद वर्तन करून विनयभंग केल्याचा आरोप होता.

या प्रकरणी १७ एप्रिल २०२० रोजी अकोले पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३६३, ३६६, ३५४, १८८ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४, ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर दोषारोपपत्र सादर करण्यात आले.

गेल्या सहा वर्षांपासून हा खटला संगमनेर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात प्रलंबित होता. सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने सात साक्षीदार तपासले. मात्र, बचाव पक्षाचे वकील ॲड. निखिल वाकचौरे यांनी आरोपीला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आल्याचा दावा करत साक्षीदारांची प्रभावी उलटतपासणी केली. तसेच, अकोले तहसीलदारांसमोर झालेली ओळख परेड कायदेशीर नियमांचे पालन करून झालेली नसल्याचा मुद्दाही त्यांनी न्यायालयासमोर मांडला.

बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपीचा या गुन्ह्याशी थेट संबंध सिद्ध होत नसल्याचे नमूद करत त्याची निर्दोष मुक्तता केली.

या खटल्यात आरोपीच्या वतीने ॲड. निखिल वाकचौरे यांनी मुख्य वकील म्हणून काम पाहिले. त्यांना ॲड. महेश जेजुरकर व ॲड. कावेरी जाधव यांनी सहकार्य केले.

## संगमनेरच्या पारस बिडकरचा राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत झंझावाती यश



### ५७ किलो गटात रौप्यपदक पटकावले

संगमनेर(युवावार्ता प्रतिनिधी)-

छत्तीसगड येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत संगमनेर तालुक्यातील पारस सुभाष बिडकर याने उल्लेखनीय कामगिरी करत ५७ किलो वजनी गटात रौप्यपदक (सिल्व्हर मेडल) पटकावले आहे. या ऐतिहासिक यशामुळे संगमनेर तालुक्यासह साकूर परिसर आणि सिताई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, घारगाव यांचे नाव देशपातळीवर झळकले आहे.

पारस बिडकर हा सध्या सिताई महाविद्यालयात प्रथम वर्ष कला शाखेत शिक्षण घेत असून, त्याची खेळातील जिद्द आणि मेहनत यामुळे त्याने राष्ट्रीय स्तरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. छत्तीसगड येथे झालेल्या 'खेलो इंडिया' स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून त्याची निवड झाली होती. त्या संधीचे सोनं करत पारसने थेट अंतिम फेरी गाठत रौप्यपदकावर आपले नाव कोरले.

अत्यंत हालाखीच्या परिस्थितीवर मात करत पारसने आपल्या मेहनतीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. कठोर परिश्रम, चिकाटी आणि न डगमगणारी जिद्द यामुळे त्याने राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत दबदबा निर्माण केला आहे. त्याच्या या कामगिरीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

पारसच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष मा. जनार्दन आहेर यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच संस्थेचे व्यवस्थापक मा. निलेश अशोक आहेर, महाविद्यालयाचे प्राचार्य इंगळे सर आणि सीईओ प्रा. मंगेश वाघमारे यांनी त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

पारस बिडकरच्या या यशामुळे संगमनेर तालुक्याच्या क्रीडा क्षेत्राला नवे बळ मिळाले असून, भविष्यात तो आणखी मोठ्या स्पर्धांमध्ये देशाचे नाव उज्वल करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## संगमनेरात ३६ कोटी ७७ लाखांची 'महसूल' वसूली

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

संगमनेर तालुक्यात २०२५-२६ या वर्षीची जमिन वसूली ३३.८० टक्के तर गौण खनिज वसुलीने उदिष्ट ओलाडले असून १०४.३७ टक्के झाली. जमिन व गौण खनिज महसूल वसुली एकूण ३६ कोटी ७७ लाख झाली असल्याची माहिती तहसीलदार धिरज मांजरे यांनी दिली.

महसूल विभागाच्या वतीने संगमनेर तालुक्यात जमीन व गौण खनिज वसुली केली जाते. दरवर्षी वसुलीचे उद्दिष्ट ठरवून दिले जाते. २०२५-२६ या वर्षासाठी जमीन वसुलीचे १७ कोटी दोन लाख २९ हजार रुपये वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. ३१ मार्च अखेर ५ कोटी ७५ लाख ३६ हजार रुपयांची वसुली करण्यात आली. जमिन महसुलीत शेतसारा, वर्ग दोनची एक करणे, बिनशेती करणे याचा समावेश आहे. याची टक्केवारी ३३.८० इतकी असून जमिन वसूली कमी झाली आहे. तर गौण खनिजचे उदिष्ट २९ कोटी ७५ लाख रुपये इतके होते. यंदा उदिष्ट ओलाडले असून ३१ मार्च अखेर ३१ कोटी ४ लाख ९० हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. त्याची टक्केवारी १०४.३७ आहे. जमीन व गौण खनिज या दोन्हीचे एकुण उदिष्ट ४६ कोटी ७७ लाख २९ हजार इतके होते. ३१ मार्च अखेर ३६ कोटी ८० लाख २६ हजार रुपयांची


वसुली करण्यात यश आले. याची एकूण टक्केवारी ७८.६८ आहे. मागिल वर्षांची जमीन व गौण खनिज २०२४-२५ ची वसुली ८२.४८ टक्के इतकी होती. यंदाची जमीन व गौण खनिज महसूल वसुलीची टक्केवारी गतवार्षिपेक्षा ५ टक्केनी कमी आहे. जमिन महसूलीत यंदा घट झाली असून गौण खनिजेच उद्दिष्टाहून अधिक वसुली झाली आहे. हे महसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले असल्याचे तहसीलदार मांजरे यांनी सांगितले.

जमिन व गौण खनिज महसूल वसुलीचे यंदा एकुण उदिष्ट ४६ कोटी ७७ लाख २९ इतके होते. ३१ मार्च अखेर ३६ कोटी ८० लाख २६ हजार इतकी वसुली करण्यात आली.

## घाटमाथ्याचे पाणी दुष्काळी गावांना द्या - मागणी

**कोपरगाव (युवावार्ता प्रतिनिधी)–**

गोदावरी खोरे हे पाण्याच्या बाबतीत तुटीचे खोरे असून, याबाबत सरकारने मराठवाड्यास पाणी देण्यासाठी सुरुवातीला नव्वद हजार कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु नगर जिल्ह्यातील दुष्काळी गावांचा विचार केलेला नाही. त्यामुळे नगर-नाशिक जिल्ह्यातील वर्षानुवर्षे दुष्काळी असलेल्या आणि निळवंडे आणि भोजापूर धरणाच्या लाभक्षेत्रातील गावांना अग्रक्रमाने पाणी द्यावे, अशी मागणी सोमवारी निळवंडे कालवा कृती मिती आणि शेतकरी संघटनेने उर्ध्व वरा-२ (निळवंडे) धरणाचे कार्यकारी नभियंत्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



सरकारने उर्ध्व गोदावरी खोऱ्यासाठी पहिल्या टप्प्यात ९० हजार कोटी रुपाची आर्थिक तरतूद केली आहे. तशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केली आहे.

मात्र, त्यात केवळ मराठवाडा विभाग सरकारने डोळ्यासमोर ठेवला आहे. अहिल्यानगर आणि नाशिकच्या पूर्वेकडील दुष्काळी १८२ गावांचा सरकारला विसर पडल्याचे दिसून येत आहे शिवाय भोजापूर या १३.२ द. ल. घ. मी. क्षमतेच्या छोट्या प्रकल्पातील जवळपास सिन्नर तालुक्यातील १२, तर संगमनेर तालुक्यातील ७ गावे असे व एकूण १९ गावे उपेक्षित आहे. त्यामुळे सोमवारी शेतकरी संघटना आणि निळवंडे कालवा कृती समिती यांनी संयुक्तपणे निळवंडे धरणाचे कार्यकारी अभियंता प्रदीप हापसे,

कालवा विभागाचे अभियंता अमोन कवडे यांची भेट देऊन त्यांना निवेदन दिले आहे.

त्यात त्यांनी पश्चिमेचे पाणी आधी या निळवंडे धरणाचे लाभक्षेत्रातील दुष्काळी १९० गावे व भोजापूर धरणाचे खालील १९ गावे अशा २०९ गावांना पाणी आरक्षित करावे, अशी मागणी केली आहे. याप्रसंगी निळवंडे कालवा कृती समितीचे संस्थापक नानासाहेब जवरे, शेतकरी संघटनेचे सचिव रूपेंद्र काले, कार्याध्यक्ष मच्छिंद्र दिघे, संघटक नानासाहेब गाढवे, उत्तमराव जोंधळे, तानाजी शिंदे, भाऊसाहेब शिंदे, भाऊसाहेब सोनवणे, प्रकाश सोनवणे, बाळासाहेब सोनवणे, सौरभ शेळके, ज्ञानदेव शिंदे, रावसाहेब मासाळ, दिनकर चासकर, अशोक गांडोळे, विलास सोनवणे, सुधाकर शिंदे, भिवराज शिंदे, नंदू भडांगे आदी शेतकरी उपस्थित होते.

## संपादकीय...

# जागतिक अस्थिरता आणि भारतीय अर्थव्यवस्था

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या तणावपूर्ण संघर्षामुळे ऊर्जा पुरवठा साखळीवर मोठा परिणाम होत असून त्याचे दूरगामी परिणाम सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होऊ लागले आहेत. सुरुवातीला हा संघर्ष मर्यादित काळात संपेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती, मात्र कालांतराने परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनत चालली आहे. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीसारख्या महत्त्वाच्या मार्गांवर अडथळे निर्माण झाल्याने जागतिक तेल वाहतूक विस्कळीत झाली आहे. परिणामी हजारो जहाजे आणि तेल टँकर्स अडकून पडल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात अस्थिरता वाढली आहे. या घडामोडींचा थेट परिणाम केवळ इंधनाच्या किमतींवरच नव्हे, तर अनेक उद्योगांवर आणि सामान्य माणसाच्या जीवनशैलीवरही होत आहे. क्रूड तेल हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे मूलभूत आधारस्तंभ मानले जाते. त्यापासून निर्माण होणाऱ्या पेट्रोकेमिकल पदार्थांचा वापर औषधे, प्लास्टिक, खत, वस्त्रनिर्मिती, बांधकाम आणि अन्नपदार्थ पॅकेजिंग यांसारख्या विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे क्रूड तेलाच्या पुरवठ्यात अडथळा निर्माण झाला की त्याचा परिणाम केवळ पेट्रोल आणि डिझेलपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेवर त्याची छाया पडते. उद्योगांना लागणारा गॅस पुरवठा कमी झाल्याने उत्पादनात अडथळे येत आहेत. विशेषतः अन्न प्रक्रिया उद्योग, हॉटेल व्यवसाय आणि सिरॅमिक उद्योग यांना याचा मोठा फटका बसू लागला आहे. उत्पादन घटल्यामुळे रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. औषध उद्योगही या संकटापासून दूर नाही. अनेक आधुनिक औषधांचे उत्पादन पेट्रोकेमिकल घटकांवर अवलंबून असते. त्यामुळे कच्चा माल कमी पडू लागल्यास औषधांचे उत्पादन मंदावू शकते. त्याचप्रमाणे औषधांचे पॅकेजिंग करण्यासाठी लागणाऱ्या काचेच्या बाटल्या आणि प्लास्टिक साहित्य यांच्या पुरवठ्यातही अडचणी निर्माण होऊ शकतात. परिणामी आरोग्य क्षेत्रात औषधांची उपलब्धता आणि किंमत या दोन्ही गोष्टींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. लसीकरणासारख्या महत्त्वाच्या प्रक्रियांवरही याचा अप्रत्यक्ष परिणाम होऊ शकतो. कृषी क्षेत्रावरही या परिस्थितीचे सावट दिसून येत आहे. रासायनिक खतांच्या उत्पादनासाठी लागणारे कच्चे पदार्थ मोठ्या प्रमाणावर काही विशिष्ट प्रदेशांमधून येतात. या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यास खतांची टंचाई निर्माण होऊन शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. खतांचे दर वाढल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक ताण वाढेल आणि अन्नधान्याच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. अन्नटंचाई आणि महागाई या दोन्ही गोष्टी एकत्र आल्यास सामाजिक असंतोष निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय सल्फर, हेलियम यांसारख्या औद्योगिक वायूंच्या तुटवड्यामुळे तंत्रज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रातही अडचणी निर्माण होत आहेत. हेलियम हा एमआरआय यंत्रणा आणि सेमीकंडक्टर उत्पादनासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्याचा पुरवठा खंडित झाल्यास आरोग्य सेवा आणि डिजिटल उद्योग या दोन्ही क्षेत्रांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत सेमीकंडक्टरची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने या क्षेत्रातील अडथळे जागतिक पातळीवर परिणाम घडवू शकतात. अल्युमिनियम आणि इतर धातूंच्या पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे पॅकेजिंग उद्योग, पेय उद्योग आणि वैद्यकीय उपकरण निर्मितीवरही परिणाम होत आहे. उत्पादन खर्च वाढल्यामुळे वस्तूंच्या किमती वाढत आहेत. याचा परिणाम शेवटी ग्राहकांवरच होणार आहे. दैनंदिन वापरातील वस्तू महाग झाल्याने सामान्य कुटुंबांच्या अर्थसंकल्पावर ताण वाढेल. इंधन दरवाढ ही या सर्व समस्यांची केंद्रबिंदू ठरत आहे. वाहतूक खर्च वाढल्याने अन्नधान्य, भाजीपाला, दूध आणि इतर जीवनावश्यक वस्तू महाग होण्याची शक्यता आहे. विमान प्रवासापासून ते घरगुती वापराच्या वस्तूपर्यंत सर्वच गोष्टींवर याचा परिणाम दिसून येईल. लघुउद्योग, गृहउद्योग आणि पर्यटन क्षेत्राला विशेषतः याचा मोठा फटका बसू शकतो. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आणि प्रशासनाने एकत्रितपणे सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. अनावश्यक खर्च टाळणे, संसाधनांचा योग्य वापर करणे आणि स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देणे यांसारख्या उपाययोजना महत्त्वाच्या ठरू शकतात. दीर्घकाळ चालणाऱ्या जागतिक संघर्षाचे परिणाम किती व्यापक असू शकतात, याची जाणीव ठेवून भविष्यासाठी सज्ज राहणे ही काळाची गरज आहे.






# श्रीक्षेत्र निझर्णेश्वर येथे श्री संत गोपाजी बाबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा उत्साहात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र निझरनेश्वर मंदिरात श्री संत गोपाजी बाबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना गुरुवार, हनुमान जयंती दिनांक २.४.२०२६ या दिवशी महंत महामंडलेश्वर १००८ गोरखगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते संपन्न झाली. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

परमपूज्य महंत गंगागिरीजी महाराज यांनी सुरू केलेला आणि गुरुवर्य नारायणगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने चालू असलेला १३५ वा अखंड हरिनाम सप्ताहाची आज गोरखगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता करण्यात आली. सप्ताहाच्या समारोप प्रसंगी भाविकांची मोठी उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाला माननीय आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम ताई खताळ उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे पंचक्रोशीतील शिवभक्त, भजनी मंडळ, तरुण मित्र मंडळ, गोपाजी बाबा मित्र मंडळ बहादरपूर तालुका कोपरगाव, निझरनेश्वर देवस्थान ट्रस्ट आणि कोकणगाव, शिवापूर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक उत्साहात हा सोहळा संपन्न झाला.

# दारू दुकान बंदीसाठी महिला आक्रमक



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर तालुक्यातील समानापूर गावात विनापरवाना सुरू असणारे देशी दारूचे दुकान बंद करा आणि आम्हाला पाणी द्या अशा जोरदार घोषणाबाजी करत कोल्हार घोटी राज्य महामार्गावर समनापुर ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले.

समनापूर गावात सुरू असणारे दारूचे दुकान बंद करण्यासाठी गेल्या तीन वर्षापासून ग्रामस्थ लढा देत आहे. परंतु राज्य उत्पादन शुल्क आणि पोलीस प्रशासनाला जाग येत नाही. म्हणून ग्रामस्थांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. यावेळी देवा शेरमाळे, प्रभाकर गेठे, संजय शेरमाळे, सौ. वंदना शेरमाळे यांच्यासह महिलांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. आंदोलकांच्या वतीने दिलेले निवेदन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे इन्स्पेक्टर गोकुळ नाईक वाडी यांनी स्वीकारले.

## अभिषेक शर्माला मॅच फीच्या २५ टक्के दंड

सनरायझर्स हैदराबादचा सलामीवीर अभिषेक शर्माला आयपीएल सामन्यादरम्यान आचारसंहितेच्या उल्लंघनासाठी दंड ठोठावण्यात आला आहे. कोलकाता नाइट रायडर्स विरुद्ध गुरुवारी ईडन गार्डन्सवर खेळल्या गेलेल्या सामन्यात त्याने आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केले, ज्यामुळे त्याला मॅच फीच्या २५% दंड ठोठावण्यात आला. यासोबतच त्याच्या खात्यात एक डिमेरिट पॉइंटही जोडण्यात आला आहे. अभिषेकने आपली चूक मान्य केली आहे. आयपीएलने जारी केलेल्या निवेदनानुसार, त्याने लेव्हल-१ च्या गुन्ह्याखाली मॅच रेफरीने दिलेली शिक्षा स्वीकारली आहे. अभिषेक शर्माला आयपीएलच्या आचारसंहितेच्या आर्टिकल २.३ च्या उल्लंघनासाठी दोषी ठरवण्यात आले आहे. हे आर्टिकल सामान्यतः सामन्यादरम्यान 'अयोग्य वर्तन' किंवा खेळाच्या भावनेच्या विरुद्ध टिप्पण्या किंवा इशाऱ्यांशी संबंधित असते.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी आयोजित विशेष प्रार्थना सभा उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडली. सुट्टीनंतर शाळेत परतलेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्सुकता आणि नव्या स्वप्नांची चमक स्पष्ट दिसत होती.

कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानदेवतेच्या सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर प्रार्थना, शपथविधी आणि दैनंदिन बातम्यांनी वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. अक्षिता मिश्रा हिने आपल्या ओघवत्या आणि आत्मीय स्वागतपर भाषणातून सर्वांचे मन जिंकले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेली नाटिका आणि आकर्षक नृत्याविष्कार हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. या सादरीकरणांमधून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि टीमवर्क सुंदरपणे दिसून आला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि यशस्वी आयोजन करण्यासाठी वर्ग शिक्षिका पूनम थोरात, नृत्य शिक्षिका अनुजा वाघमारे आणि कार्यक्रम समन्वयक पंकज कुटे यांचे विशेष योगदान लाभले. नवीन शैक्षणिक सत्राच्या मध्यात शाळेत रुजू झालेल्या नवीन शिक्षकांचा परिचय व सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी शिक्षकांचे शाळा परिवारात स्वागत करून त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या ज्ञान व अनुभवामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत निश्चितच भर पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यानंतर अमित सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिस्त, सातत्य आणि परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते मुख्याध्यापिका श्रीमती मीनाक्षी मिश्रा यांचे प्रेरणादायी भाषण. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले, प्रत्येक नवीन दिवस ही एक सुवर्णसंधी आहे. आत्मविश्वास, सकारात्मकता आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर तुम्ही तुमचे स्वप्न नक्कीच पूर्ण करू शकता. या नव्या सुरुवातीचा पूर्ण फायदा घ्या आणि उत्कृष्टतेकडे वाटचाल करा.

कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला आणि राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली.

ही विशेष सभा केवळ नव्या सत्राची सुरुवात नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनात नवचैतन्य, प्रेरणा आणि यशस्वी भविष्याची उमेद निर्माण करणारी ठरली. सर्व विद्यार्थ्यांनी नव्या उमेदीने आणि जिद्दीने पुढे जाण्याचा संकल्प केला. शाळेचे उपप्राचार्य श्री. योगेश आवारी तसेच सर्व समन्वयक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना आगामी शैक्षणिक वर्षासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. येणारे वर्ष विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक प्रगतीसाठी यशस्वी व फलदायी ठरो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. शिंदे संदिप किसनराव रा. मालदाड रोड, संगमनेर, म्यु.घ.नं. -, सि. स. नं. - १२१/१६४, स. नं. या ठिकाणी मध्ये कृषी सेवा केंद्र चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. ०१/०४/२०२६ मुख्याधिकारी - संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME JAYDEEP BABAN PADWAL

TO NEW NAME AS JAYDEEP BABANRAO PADWAL

ADD – TAJANE MALA, NAVIN NAGAR ROAD, SANGAMNER, TAL- SANGAMNER DIST- AHILYANAGAR


**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर | स्टोअर मॅनेजर | फ्लोअर मॅनेजर | हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ | १२ ते ९
9511238422

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**युवावार्ता** परिवर्तनाचा पुरस्कर्ता
**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची




# जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी अ‍ॅग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला, वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ऑसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

**पाहिजेत**
सेल्समन - १ जागा
सर्विस प्रोव्हायडर हेल्पर ०१ जागा
अकाउंटंट - ०१ जागा
कामाचे ठिकाण : संगमनेर
M/s. Pawar and Sons
7498621873

**हेल्पर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
मुलगा/पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**बंगला भाड्याने पाहिजे**
2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर, ०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या, व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शत नाही, याची नोंद घ्यावी




MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

# गंधे इन्व्हेस्टमेंटच्या सतेज गंधे यांचा प्रीमिअर सर्कल अवॉर्डने सन्मान

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर येथील गंधे इन्व्हेस्टमेंटचे संचालक सतेज गंधे यांना म्युच्युअल फंड क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिष्ठित प्रीमिअर सर्कल अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे संगमनेरच्या व्यावसायिक क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.



पुरस्कार स्वीकृत करताना सतेज गंधे यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, हा सन्मान केवळ माझा नसून गंधे इन्व्हेस्टमेंटवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक ग्राहकाचा आहे. त्यांनी पुढे आर्थिक साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, आजच्या बदलत्या काळात प्रत्येकाने आर्थिकदृष्ट्या सजग होणे अत्यावश्यक आहे. केवळ बचत करणेच नव्हे, तर त्या बचतीचे योग्य नियोजन करून ती वाढवणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्राहकांच्या आर्थिक प्रगतीसाठी गंधे इन्व्हेस्टमेंट सदैव तत्पर असल्याचे सांगत, ग्राहकांचा विश्वास हेच आमचे खरे यश आहे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यांच्या या भूमिकेमुळे गुंतवणूक क्षेत्रात त्यांनी विश्वासार्हता निर्माण केली आहे. सतेज गंधे यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# नामदार चषक २०२६ : शिवगर्जना प्रतिष्ठानचा दणदणीत विजय

## २ लाख रुपये व अल्टो कार बक्षिसात पटकावली

लोणी (युवावार्ता प्रतिनिधी)-

मा. खा. डॉ. सुजयदादा विखे पाटील मित्रमंडळ, लोणी खुर्द यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली नामदार चषक लोणी प्रीमियर लीग २०२६ ही भव्यदिव्य दिवस-रात्र क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. दिनांक २४ मार्च २०२६ ते २९ मार्च २०२६ या कालावधीत रंगलेल्या या स्पर्धेने केवळ अहिल्यानगर जिल्हाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील क्रिकेटप्रेमींचे लक्ष वेधून घेतले. क्रिकेटचा महासंग्राम म्हणून ओळखली जाणारी ही स्पर्धा राज्यातील सर्वात मोठ्या आणि मानाच्या टेनिस क्रिकेट स्पर्धांपैकी एक ठरली.

स्पर्धेचे उद्घाटन नामदार डॉ. राधाकृष्ण विखे यांच्या शुभहस्ते पार पडले. तसेच डॉ. सुजय विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय आण्णासाहेब म्हस्के , शालिनीताई विखे, धनश्रीताई विखे पाटील आणि डॉ. सुमिता विखे पाटील इ. उपस्थित होते. ६ दिवस चाललेल्या या स्पर्धेत दररोज दिवसरात्र ८ षटकांच्या सामन्यांचा थरार अनुभवायला मिळाला. महाराष्ट्रभरातील नामांकित संघ, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. स्पर्धेचे थेट प्रक्षेपण ७एस युट्युब चॅनेलवरून करण्यात आले, त्यामुळे जगभरातील प्रेक्षकांनीही या स्पर्धेचा आनंद घेतला.



स्पर्धेतील विजेत्या संघाला तब्बल २,००,०००/- रुपये रोख पारितोषिकासह मारुती सुझुकी कंपनीची अल्टो कार देण्यात आली, तर उपविजेत्या संघाला १,००,०००/- रुपये आणि इतर आकर्षक बक्षिसे देण्यात आली. तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठीही विशेष पारितोषिके ठेवण्यात आली होती. याशिवाय प्रेक्षकांसाठी दररोज लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये स्पोर्ट्स सायकल देण्यात आली. तसेच अंतिम दिवशी इलेक्ट्रिक बाईक जिंकण्याची सुवर्णसंधीही उपलब्ध करून देण्यात आली होती.

स्पर्धेचा अंतिम सामना अत्यंत रोमांचक झाला. शिवगर्जना प्रतिष्ठान आणि शंभूराजे ११ या दोन बलाढ्य संघांमध्ये चुरशीची लढत झाली. मात्र, संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता अपराजित राहिलेल्या शिवगर्जना प्रतिष्ठान संघाने आपल्या दमदार खेळाच्या जोरावर अंतिम सामन्यात विजय मिळवत करंडकावर कब्जा केला. संघमालक निखिल गुंजाळ व देविदास वदक यांच्या नेतृत्वाखालील या संघाने उत्कृष्ट संघभावना, रणनीती आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या बळावर हा ऐतिहासिक विजय मिळवला.

लोणी खुर्द येथील सादतपूर रोडवरील गणपती मंदिर परिसरात आयोजित या स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. मैदानावर प्रेक्षकांची मोठी गर्दी उसळली होती आणि प्रत्येक सामना उत्साहाच्या वातावरणात पार पडला. विशेष म्हणजे, सचिन हिंगे व संपूर्ण आयोजक टीमने एकत्रितपणे अत्यंत उत्कृष्ट नियोजन करत ही स्पर्धा वेगळ्याच उंचीवर नेली. त्यांच्या मेहनतीमुळे आणि व्यवस्थापन कौशल्यामुळे नामदार चषक २०२६ ही स्पर्धा खऱ्या अर्थाने भव्य, दिव्य आणि यशस्वी ठरली. एकूणच, नामदार चषक लोणी प्रीमियर लीग २०२६ ही स्पर्धा केवळ क्रिकेटपुरती मर्यादित न राहता, ती एक उत्सव, एक महाकुंभ आणि क्रिकेटप्रेमींसाठी एक पर्वणी ठरली. भविष्यातही अशाच भव्य स्वरूपात ही स्पर्धा आयोजित केली जाईल, अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली.

# राज्यात विशेष पुर्ननिरीक्षण मोहीम निष्पक्ष राबवा

## मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना काँग्रेस शिष्टमंडळाची मागणी

मुंबई (प्रतिनिधी)-

निवडणूक आयोगाकडून राबवण्यात येणारी विशेष पुनरीक्षण मोहिमेवर (एसआयआर) अनेक राज्यातून चिंता व्यक्त करण्यात आलेली आहे. जाणीवपूर्वक विशिष्ट जाती, धर्माची मते वगळण्यात येत असल्याच्या तक्रारी येत आहेत. काही राज्यात निवडणुकीच्या तोंडावर जाणीवपूर्वक केलेल्या एस.आय.आर. मोहिमेत प्रचंड घोटाळे झाल्याचे दिसत आहेत. सत्ताधारी पक्षाला यातून फायदा होईल अशा पद्धतीने ही मोहिम राबवली जात असल्याचे दिसून आले आहे, म्हणून महाराष्ट्रात होणारी एसआरआर मोहिम कोणतीही घाईगडबड न करता निष्पक्षपणे राबवावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाने केल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या शिष्टमंडळाने आज राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांची भेट घेऊन एक निवेदन सादर केले. यावेळी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य नसीम खान, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व तेलंगणाचे सहप्रभारी सचिन सावंत, प्रदेश सरचिटणीस ड. संदेश कोंडविलकर, प्रदेश सरचिटणीस अभिजित सपकाळ आदी उपस्थित होते.

याभेटीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, महाराष्ट्रात २००२-०४ या काळात एसआयआर प्रकिया राबविण्यात आली होती. ही संपूर्ण मोहीम कोणत्याही घाईगडबडीत न करता जवळपास १३ महिन्यांच्या कालावधीत घेण्यात आली होती. आता २५ वर्षानंतर ही प्रक्रिया होत असताना साडेतीन कोटींनी वाढलेल्या मतदारसंख्येचा विचार करून या प्रक्रियेचे नियोजन करावे. महाराष्ट्रात पुढील २-३ वर्षात कोणत्याही निवडणुका नसल्याने ही प्रक्रिया दीड-दोन वर्ष चालली तरी आक्षेप घेण्याचे कारण नाही. पुरेसा वेळ देऊन ही प्रक्रिया केल्यास जनतेच्या मनात संशयाची भावना राहणार नाही. जनगणना आणि एस.आय.आर. एकाच अधिकारी वा कर्मचा-याकडून करू नये. राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना एस.आय.आर. च्या सॉफ्ट कॉपी, ओसीआर किंवा मशीन रिडेबल स्वरूपात तसेच हार्ड कॉपी देण्यात याव्यात. एस.आय.आर. वर आक्षेप नोंदविण्यासाठी तसेच नोटिशीला उत्तर देण्यासाठी किमान एक महिन्याची मुदत देण्यात यावी.

सपकाळ पुढे म्हणाले की, एखाद्या मतदाराचे नाव वगळण्यापूर्वी त्याचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी किमान सात दिवसांची नोटीस दिली जाणे गरजेचे आहे. बीएलओ कोणतीही व्यक्ती, संस्था वा राजकीय नेते यांच्या दबावात काम करणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे, तसेच बीएलए नोंदणीसाठी विशेष मोहीम राबवावी. संपूर्ण एसआयआर प्रक्रियेचा डेटा किमान पाच वर्षे ईआरओ आणि डीईओ स्तरावर जतन केला जावा. तसेच, राजकीय पक्षांना त्यांच्या आवश्यकतेनुसार हा डेटा उपलब्ध करून दिला जावा. नमुना ७ अर्जाची काटेकोर तपासणी केली जावी. 'अनुपस्थित, स्थलांतरित किंवा मृत' (एएसडी) म्हणून चिन्हांकित केलेल्या मतदारांची यादी मतदान केंद्र स्तरावर मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना वेळेवर दिली द्यावी. नागरिकत्व सिध्द करायला लावणारी वा एनआरसीची मागच्या दाराने अंमलबजावणी करणारी प्रक्रिया होणार नाही, याची काटेकोर काळजी घेण्यात यावी. केवळ मतदार नोंदणीपुरतीच ही प्रक्रिया मर्यादित ठेवावी. तसेच निवडणूक जाहीर झाल्यावर नोंदणी थांबवण्यात यावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्याचे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

# शक्ती-युक्ती-भक्ती आणि स्वामिनिष्ठेचा संगम म्हणजे हनुमान - गिरीश मालपाणी



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

रामभक्त हनुमंताकडून शक्ती, युक्ती, भक्ती आणि पराकोटीची स्वामीनिष्ठा शिकावी, म्हणजे जीवनातील यशाचा मार्ग अधिक प्रशस्त होईल. मारुतीरायाचे संपूर्ण जीवन केवळ श्रीरामभक्तीच्या भोवती केंद्रीत राहीले आहे. दरम्यान प्रत्येक संकटातून मार्ग काढताना त्यांच्या शक्ती आणि युक्तीचा संगम बघायला मिळतो. आपल्या संस्कृतीत असलेली पूजनीय प्रतिके यशाचा मार्ग दाखवणारीच आहेत. त्यात हनुमानाची स्वामीनिष्ठा उच्च असल्याचे प्रतिपादन मालपाणी उद्योग समूहाचे संचालक गिरीश मालपाणी यांनी केले. हनुमान जयंतीनिमित्ताने मालपाणी इंडस्ट्रियल पार्कमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी व अन्य अधिकारी वर्ग यावेळी उपस्थित होता.

गिरीश मालपाणी म्हणाले की, बजरंगबली हनुमानाचे संपूर्ण चरित्र प्रेरणेने आणि स्फूर्तीने भरलेले आहे. बलोपासना मंत्र देऊन आनंदी, निरामय, दीर्घायुष्य कसे जगावे, हे त्यांनी दाखवून दिले आहे. प्रभू रामचंद्रांशी असलेली त्यांची असीम निष्ठा आपल्याला खूप काही शिकवून जाते. बजरंगबली म्हणजे काळ, काम आणि वेग या तीन गोष्टींचा अतुलनीय समन्वय साधणारे होते. एक प्रकारे व्यवस्थापनाचे ते गुरुच असल्याचेही त्यांनी सांगितले.

मारुतीरायामध्ये अफाट शक्ती तर होतीच, त्याचसोबत निश्चल, अविचल श्रीराम भक्ती त्यांच्या नसांत भिनलेली होती. योग्य त्या ठिकाणी योग्य ती युक्ती वापरून समस्येवर मात करण्याची त्यांची अद्भुत शैली आजही अभ्यास करण्यासारखी आहे. त्यामुळेच हनुमान जयंतीच्या शुभदिनी प्रत्येकाने श्रीराम भक्ती सोबतच शक्तीच्या उपासनेचा संकल्प केला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मालपाणी उद्योग समूहातील सुरक्षा विभागाकडून दरवर्षी हा सोहळा आयोजित केला जातो. याप्रसंगी सुमारे दोनशे किलो मोतीचूर लाडू आणि पंजेरी प्रसादाचे वाटप केले जाते. या कार्यक्रमाला मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक शिवाजी आहेर, बालाजी लकाल पाटील, कारखाना व्यवस्थापक रमेश घोलप, सुरक्षा विभागाचे प्रमुख भारत मोरे, आदींसह उद्योग समूहातील कर्मचारी-कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुरारी देशपांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

# बुवाबाज आमदारांच्या राजीनाम्यासाठी माकप छेडणार आंदोलन

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

बुवाबाजीला शरण जात राज्यातील ३९ आमदार अशोक खरातच्या तंत्र-मंत्र भोंदूगिरीत सामील झाल्याचे आरोप होत आहेत. अशा आमदारांची यादी राज्य सरकारने तातडीने जाहीर करावी व या आमदारांचे राजीनामे घ्यावेत अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कमिटीने केली असून या आमदारांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी राज्यभर तालुक्या-तालुक्यांमध्ये तीव्र आंदोलन करण्याची हाक देण्यात आली आहे.

निवडून गेलेले लोकप्रतिनिधी संविधानिक पदावर असतात. संविधानाने त्यांच्यावर वैज्ञानिक दृष्टिकोन अंगिकारण्याची व तो जनतेत रुजवण्याची जबाबदारी दिली आहे. ही संविधानिक जबाबदारी पार न पाडता या उलट वर्तन करणे म्हणजे लोकप्रतिनिधी म्हणून संविधानाने टाकलेली जबाबदारी पार न पाडणे आहे. अशा लोकप्रतिनिधींच्या निमित्ताने तंत्र-मंत्र, जादू-टोणा इत्यादी अंधश्रद्धेच्या गोष्टींना राजमान्यता मिळत असते. त्यामुळे सामान्य जनताही अशा भोंदू बाबांच्या भोंदूगिरीला बळी पडत असते. भोंदू बाबा जितके गुन्हेगार आहेत तितकेच गुन्हेगार त्यांना समर्थन देणारे, शरण जाणारे व आपल्या अनुयायांना बुवा-बाबांवर विश्वास ठेवण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दिशानिर्देश करणारे लोकप्रतिनिधीही गुन्हेगार आहेत. अशा गुन्हेगारांवर तत्काळ कारवाई करावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे.

भोंदू बाबा अशोक खरात याच्या शोषणाला बळी पडलेल्या अनेक महिलांचे वाईट व्हिडिओ मोठ्या प्रमाणात समाज माध्यमांवर फिरत आहेत. त्यामुळे बळी पडलेल्या महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठेला ठेच पोहोचत आहे. असे व्हिडिओ समाज माध्यमांतून तातडीने हटविण्याची कारवाई राज्य सरकारने करावी अशी मागणीही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे. भोंदू बाबा अशोक खरात याच्यावर कठोर कारवाई करत असतानाच त्याला समर्थन देणाऱ्या सर्व लोकप्रतिनिधींवर व विविध मार्गाने त्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहाय्य करणाऱ्या सर्वांवर कठोरातील कठोर कारवाई करावी अशी मागणी माकप करत आहे.

बाबा खरात याच्याबरोबरच इतरही अनेक गावागावांमध्ये सध्या भोंदू बाबांचे उदंड पीक आले आहे. राज्यकर्त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकवादाचा पाठपुरावा करण्याऐवजी जाती आणि धर्म आधारित द्वेषवादी अंधश्रद्ध राजकारणाला बळ दिल्याचा हा परिणाम आहे. राज्य सरकारने राज्यातील या सर्व भोंदू बाबांचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे.

सोबतच, प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाची स्थापना करून ते कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय त्वरित अमलात आणा, जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम तयार करून सदर कायद्याची कठोर अंमलबजावणी करा व सोशल मीडियातून होणाऱ्या बाबा-बुवा, ज्योतिषी, मंत्र-तंत्र यांच्या अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींचे नियमन करणारी स्वतंत्र यंत्रणा तातडीने तयार करा, या मागण्याही माकपच्या वतीने करण्यात येत आहेत. वरील मागण्यासाठी दिनांक ६ एप्रिल रोजी होत असलेल्या राज्यव्यापी आंदोलनात जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. अजित नवले, राज्य सचिव भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांनी केले आहे.

# ऑनलाइन पेमेंटसाठी ओटीपीची गरज नाही !

## सिम-डिव्हाइस जुळले नाही तर व्यवहार थांबणार

ऑनलाइन व्यवहारांच्या वाढत्या युगात सुरक्षितता आणि सोयीसुविधा यांचा समतोल राखणे ही मोठी गरज बनली आहे. आतापर्यंत डिजिटल पेमेंटसाठी ओटीपी ही अत्यावश्यक सुरक्षा पायरी मानली जात होती. मात्र आता तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे 'सायलेंट ऑथेंटिकेशन' ही नवी संकल्पना पुढे येत आहे. या पद्धतीमुळे भविष्यात ओटीपीची गरज मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सायलेंट ऑथेंटिकेशन म्हणजे वापरकर्त्याला कोणतीही अतिरिक्त कृती न करता, पार्श्वभूमीतच त्याची ओळख पडताळून पाहणारी प्रणाली होय. या तंत्रज्ञानात मोबाईल क्रमांक, सिम कार्ड आणि वापरले जाणारे डिव्हाइस यांची एकत्रित तपासणी केली जाते. जर हे सर्व घटक एकमेकांशी जुळत नसतील, तर व्यवहार तत्काळ थांबवला जातो. त्यामुळे फसवणुकीच्या घटना रोखण्यास मोठी मदत होऊ शकते.




आजपर्यंत सिम क्लोनिंग, ई-सिम स्वॅप किंवा ओटीपी इंटरसेप्शनसारख्या तंत्रांचा वापर करून सायबर गुन्हेगार अनेकांना फसवत होते. सायलेंट ऑथेंटिकेशन या पार्श्वभूमीवर अधिक प्रभावी उपाय ठरू शकतो, कारण ही पडताळणी थेट नेटवर्क स्तरावर केली जाते. यामुळे हॅकर्सना मध्येच हस्तक्षेप करणे कठीण होते. ही प्रणाली वापरकर्त्याला दिसत नाही, त्यामुळे ती अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह मानली जाते. यासोबतच डिजिटल व्यवहारांमध्ये बायोमेट्रिक तंत्रज्ञानाचाही वापर वाढत आहे. चेहऱ्याची ओळख, फिंगरप्रिंट किंवा पमध्ये तयार होणारे कोड हे पर्याय अधिक सुरक्षित मानले जात आहेत. यामुळे व्यवहार अधिक जलद आणि सुरळीत होण्यास मदत होते. ग्राहकांना प्रत्येक व्यवहारासाठी वेगळा ओटीपी टाकण्याचा त्रास कमी होतो आणि वेळही वाचतो.

डिजिटल व्यवहारांसाठी दोन-स्तरीय प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. यामध्ये वापरकर्त्याला माहिती असलेली गोष्ट, जसे की पासवर्ड किंवा पिन, आणि वापरकर्त्याजवळ असलेली गोष्ट, जसे की मोबाईल किंवा बायोमेट्रिक ओळख, यांचा समावेश होतो. त्यामुळे सायलेंट ऑथेंटिकेशन ही पद्धत या चौकटीत बसणारी आणि अधिक प्रगत पर्याय म्हणून पाहिली जात आहे. याशिवाय, व्यवहारांशी संबंधित संदेश पाठवण्याच्या पद्धतीतही बदल होत आहेत. पारंपरिक एसएमएससोबतच इतर डिजिटल माध्यमांचा वापर वाढू शकतो. यामुळे व्यवहारांची पुष्टी जलद होईल आणि नेटवर्कवरील ताण कमी होईल. ग्राहकांचा अनुभव अधिक चांगला होईल, तसेच व्यवहार अपयशी ठरण्याचे प्रमाणही कमी होण्याची शक्यता आहे.

सायलेंट ऑथेंटिकेशनमुळे डिजिटल अर्थव्यवस्थेला नवी गती मिळू शकते. सुरक्षितता वाढल्यामुळे लोकांचा विश्वास वाढेल आणि ऑनलाइन व्यवहारांचा स्वीकार अधिक व्यापक होईल. विशेषतः ग्रामीण आणि अर्धशहरी भागात डिजिटल पेमेंट्सचा वापर वाढवण्यासाठी हे तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावू शकते. तथापि, कोणतेही नवे तंत्रज्ञान पूर्णपणे जोखमीपासून मुक्त नसते. त्यामुळे या प्रणालींची अंमलबजावणी करताना गोपनीयता, डेटा सुरक्षा आणि पारदर्शकता यांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. योग्य नियमन आणि सतत सुधारणा यांच्या मदतीने सायलेंट ऑथेंटिकेशन ही प्रणाली भविष्यात डिजिटल व्यवहारांची नवी ओळख ठरू शकते.

पॅनल
देणे आहे



दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



पॅनल
देणे आहे





भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# अवैध गॅस साठ्यावर कारवाई

## ७ भरलेले तर १२ रिकामे सिलेंडर जप्त



एआय फोटो

युवावार्ता (प्रतिनिधी)

पानोडी - संगमनेर तालुक्यातील पानोडी येथे अवैधरित्या गॅस सिलेंडरची साठवणूक करणाऱ्या एका किराणा दुकानावर गुरुवारी (दि. २) प्रशासनाने छापा टाकून कारवाई केली आहे. या कारवाईत एकूण १९ सिलेंडर जप्त करण्यात आले. यामुळे पंचक्रोशीतील गावांमध्ये अवैध साठेबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पानोडी येथील एका किराणा दुकानात घरगुती वापराच्या एलपीजी गॅस सिलेंडरची जण अवैध साठवणूक केली जात असल्याची गुप्त माहिती

पुरवठा विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे तहसीलदार धीरज मांजरे यांच्या 'सूचनेनुसार पुरवठा विभागाने तातडीने या दुकानावर छापा टाकला. तेथे ७ भरलेले आणि १२ रिकामे असे एकूण १९ एलपीजी सिलेंडर मिळून आले.या साठवणुकीबाबत दुकानदाराकडे संबंधित कोणतीही कायदेशीर परवानगी दुकानदाराकड किंवा परवाना नसल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने आणि नियमांचे उल्लंघन झाल्याने प्रशासनाने सर्व सिलेंडर जप्त केले.

जप्त करण्यात आलेले सर्व सिलेंडर नजीकच्या अधिकृत गॅस एजन्सीच्या ताब्यात ठेवण्यात आले आहेत. या प्रकरणाचा सविस्तर अहवाल आणि पुढील कार्यवाहीसाठीचा प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. दरम्यान, ही यशस्वी कारवाई तहसीलदार मांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पुरवठा अधिकारी रसिक सातपुते आणि पुरवठा निरीक्षक गणेश भालेराव यांच्या पथकाने केली आहे.

### सीआरपी महिलेवर कारवाई

संगमनेर (प्रतिनिधी)

येथील पंचायत/समिती कार्यालयातील तालुका अभियान व्यवस्थापक/ नंदलाल कोकाटे यांना जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या उद्देशाने संबंधित सीआरपी महिलेने त्यांच्याविषयी अपमानास्पद वक्तव्य केले. याबद्दल संपूर्ण उमेद अभियानाची प्रतिमा मलिन होवून बदनामी झाल्याने शहर पोलिसांत 'त्या' महिलेवर अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत संगमनेर शहर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की तालुका अभियान व्यवस्थापक नंदलाल कोकाटे यांना काही कार्यकर्त्यांनी मारहाण केली. त्यानंतर कायदेशीर कारवाई चालू असताना त्यांना संबंधित सीआरपी महिलेने कोकाटे यांच्याविषयी जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या उद्देशाने अपमानास्पद वक्तव्य केले. यामुळे उमेद अभियानाची प्रतिमा मलिन होवून बदनामी झाली आहे. याप्रकरणी तालुक्यातील सर्व सीआरपी महिलांनी दिलेल्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी संबंधित सीआरपी महिलेवर अदखलपात्र गुन्हा दाखल केला.

# अन्यथा भंडारदरा शताब्दी कार्यक्रम उधळून लावू : किसान सभेचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त राज्य सरकारकडून मोठ्या उत्साहात कार्यक्रम साजरा करण्याची तयारी सुरू असताना, धरणग्रस्त आदिवासींच्या प्रश्नांकडे अद्यापही दुर्लक्ष होत असल्याने किसान सभेने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. मागण्या पूर्ण न झाल्यास शताब्दी कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा देण्यात आला आहे.

भंडारदरा धरणाला शंभर वर्षे पूर्ण होत असताना, धरणग्रस्तांच्या विस्थापनालाही तितकीच वर्षे उलटली आहेत. मात्र आजही अनेक आदिवासी गावांना पिण्याचे व सिंचनाचे पाणी मिळालेले नाही. धरणात बुडालेल्या जमिनींच्या बदल्यात देण्यात आलेल्या जमिनी अद्याप संबंधितांच्या पूर्ण नावावर करण्यात आलेल्या नाहीत. तसेच 'वर्ग दोन'च्या जमिनी 'वर्ग एक'मध्ये रूपांतरित करून जमीन मालकी हक्क देण्याची मागणीही प्रलंबित आहे. या प्रश्नांसाठी किसान सभेकडून सातत्याने आंदोलन करण्यात येत असून नुकत्याच झालेल्या राजूर-लोणी लाँग मार्चमध्येही या मागण्या ठळकपणे मांडण्यात आल्या होत्या. त्यावेळी जलसंपदा मंत्र्यांनी शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते, तसेच जमीन नावांतराबाबतही सकारात्मक भूमिका घेतली होती. मात्र अद्याप प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप किसान सभेने केला आहे.

या पार्श्वभूमीवर किसान सभेने पुन्हा संघर्षाची भूमिका घेत जागृती मोहीम सुरू केली आहे. त्याअंतर्गत ७ एप्रिल रोजी शेंडी, घाटघर, मुरशेत, भंडारदरा परिसरातील गावांमधून हजारो शेतकऱ्यांचा वाहन मोर्चा काढण्यात येणार आहे. तसेच शेंडी येथील जलसंपदा विभागाच्या कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धरणाच्या मागील गावांना निळवंडे उच्चस्तरीय कालव्याच्या धर्तीवर गुरुत्वाकर्षण पद्धतीने पाणी पुरवठा करण्यासाठी किसान सभेने तीन स्वतंत्र प्रस्ताव शासनाकडे सादर केले आहेत. मंत्रालयस्तरीय बैठकीत या प्रस्तावांची तांत्रिक व व्यावहारिक पडताळणी करून सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र संबंधित विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात किसान सभेने अकोले तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय व जलसंपदा विभागाला निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या आंदोलनात डॉ. अजित नवले, सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, ताराचंद विघे, एकनाथ मेंगाळ, तुळशीराम कातोरे, राजाराम गंभीरे आदी पदाधिकारी सहभागी होणार आहेत.


INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


# वाढदिवस साजरा करण्याच्या बहाण्याने तरुणीवर अत्याचार, आरोपीवर गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील कौठेकमळेश्वर परिसरात १८ वर्षीय तरुणीवर वाढदिवस साजरा करण्याच्या बहाण्याने जबरदस्तीने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना २९ मार्च २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी सोमनाथ काशिनाथ बढे (रा. मेंढवण, ता. संगमनेर) याच्याविरोधात बलात्कारासह विविध गंभीर कलमान्वये तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित १८ वर्षीय तरुणी ही लोणी येथे उच्च शिक्षणासाठी ये-जा करत होती. दरम्यान, आरोपी सोमनाथ बढे हा त्याच मार्गावर चारचाकी वाहनातून प्रवास करत असल्याने दोघांची ओळख झाली. ओळखीचे रूपांतर हळूहळू परिचयात झाले. या दरम्यान आरोपीने तरुणीचा विश्वास संपादन करून तिला वारंवार फोन करून संपर्क ठेवला.

दरम्यान, पीडितेचा वाढदिवस असल्याने २८ मार्च रोजी रात्री आरोपीने तिला फोन करून वाढदिवस साजरा करण्यासाठी घराबाहेर बोलावले. सुरुवातीला तरुणीने नकार दिला, मात्र आई-वडील झोपल्यानंतर ती घराबाहेर गेली. घराच्या पाठीमागील बाजूस आरोपी केक घेऊन थांबलेला होता. केक कापल्यानंतर तरुणी घरी जाण्यास निघाली असता आरोपीने तिचा हात धरून तिला जबरदस्तीने थांबवले.

'वाढदिवसाची भेट' मागण्याच्या बहाण्याने आरोपीने तिच्याशी अश्लील वर्तन करत धमकी दिली की, नकार दिल्यास मोबाईलमधील फोटो व्हायरल करेल. या भीतीखाली त्याने तरुणीवर जबरदस्तीने अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर आरोपीने कोणालाही सांगितल्यास बदनामी करण्याची धमकीही दिली.घटनेनंतर घाबरलेल्या तरुणीने दुसऱ्या दिवशी आपल्या आई-वडिलांना सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर कुटुंबीयांनी तत्काळ तालुका पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध बलात्कारासह इतर गंभीर कलमान्वये गुन्हा नोंदवला.


चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग • किडनी विकार
• मधुमेह व हृदयरोग • मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• दमा व श्वसनाचे विकार • सर्पदंश व विषबाधा
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार • बालरोग चिकित्सा विभाग
• जनरल सर्जरी • प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया • संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२



अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13



दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर
30%ते70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605



कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25